ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २६ ऑगस्ट, १९५९ अंक ३४

## विविध माहिती

**मॉस्को येथील चित्रपट महोत्सव**—मॉस्को येथें भरविण्यांत आलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत बंगालींतील एका चित्रपटाच्या संगीताबद्दल उस्ताद विलायतखाँ ह्यांना पहिलें बक्षीस देण्यांत आलें. त्याचप्रमाणें 'मॅन्स फेट' ह्या सोव्हिएट चित्रपटाला पहिलें बक्षीस मिळालें. चित्रपटांत गेल्या महायुद्धांत नाझी लष्कराला रशिअन लोकांनीं कसें तोंड दिलें तें दाखविलें आहे.

**जळगांवला प्रवासी कचेरी**—भारत सरकारच्या प्रवासी खात्यानें जळगांव येथें आपली एक शाखा उघडली आहे. अजंठा व वेरूळ येथील जगप्रसिद्ध लेणीं पहाण्यास जाणाऱ्या प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी ती उघडण्यांत आली आहे. मुंबई, दिल्ली व वाराणशी येथून येणाऱ्या प्रत्येक गाडीच्या वेळीं एक अधिकारी स्टेशनवर हजर राहील व प्रवाशांच्या सोयीकडे पाहील.

**चहाचा सहकारी कारखाना**—कांग्रा जिल्ह्यांतील पालमपूर ह्या गांवीं चालू आर्थिक वर्षांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक चहाचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यांत रोज ५ लाख पौंड चहा तयार होऊं शकेल. कारखान्याच्या संघटनेबाबत पंजाब सरकारच्या उद्योगमंत्र्यांनीं पुढाकार घेतला होता.

**मद्रासच्या रेल्वे स्टेशनची पुनर्घटना**—मद्रासच्या रेल्वे स्टेशनाची पुनर्घटना करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी एक कोटी रुपये खर्च करण्यांत येतील. स्टेशनामधील वाहतूक वाढलेली असल्यामुळें रेल्वे स्टेशनामधील सोयींचा विस्तार करावा लागत आहे. मद्रासचें स्टेशन १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत बांधण्यांत आलें असून त्यानंतर त्यांत फारच थोडा बदल झालेला आहे.

**शिवणाच्या यंत्रांची निर्यात**—चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत भारतामधून ११,२७,००० रुपये किंमतीचीं शिवणाचीं यंत्रें निर्यात करण्यांत आलीं. गेल्या वर्षीं ह्याच कालावधींत ३,६२,००० रुपये किंमतीच्या यंत्रांची निर्यात करण्यांत आली होती. ह्या वर्षीं ब्रिटननें सर्वांत अधिक किंमतीचीं, म्हणजे ४,१७,००० रुपयांचीं यंत्रें भारताकडून आयात केलीं.

**भारताला आणखी मदत**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या बालक-निधीमधून भारताला आणखी २२,२८,००० डॉलर्सची मदत मिळणार आहे. ह्यापैकीं १२,६४,००० डॉलर्स समाज-विकास गटाच्या भागांतील आरोग्याच्या सोयी वाढविण्यासाठी खर्च करण्यांत येतील. सुमारें ५,९०,००० डॉलर्स बंगलोर येथील गोठवाड्याची यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी खर्चण्यांत येतील.

**अमरनाथला जाणारे यात्रेकरू**—काश्मीरमधील अमरनाथ ह्या प्रसिद्ध गुंफेची यात्रा करण्यासाठी ५,००० यात्रेकरू गेले आहेत. ह्या गुंफेंत बर्फाचें शिवलिंग आपोआप तयार होत असतें. यात्रा कठीण असल्यामुळें काश्मीर सरकारच्या प्रवासी खात्याला त्यांची अनेक प्रकारची सोय करावी लागते. यात्रेकरूंना अन्न-धान्य देण्याची व औषधोपचार करण्याची सोय करण्यांत आली आहे.

**केनिआमधील हिंदी स्त्रिया**—केनिआमधील हिंदी स्त्रियांना नवऱ्यापासून विभक्त राहण्याचा व घटस्फोट घेण्याचा हक्क देणारा कायदा पुढील महिन्यांत केनिआच्या कायदेमंडळांत मांडला जाणार आहे. घटस्फोटासाठी जीं कारणें योग्य समजण्यांत येतील त्यांत धर्मांतर, व्यभिचार, क्रौर्य आणि नपुंसकपणा ह्या कारणांचा अंतर्भाव करण्यांत येणार आहे. कायदा १९५५ च्या हिंदु विवाह कायद्यावर आधारण्यांत येईल.

**सहकारी डिस्टिलरी**—उसाच्या रसाच्या मळीपासून पॉवर अल्कोहोल व स्पिरिट तयार करणाऱ्या दोन डिस्टिलरीज मुंबई सरकार कराड व कोल्हापूर येथें काढणार आहे. श्रीरामपूरच्या जवळील चितळी येथे काढण्यांत येणारी डिस्टिलरी मुंबई राज्य सहकारी साखर कारखान्यांच्या फेडरेशननें सहकारी तत्त्वावर चालवावी असें मुंबई सरकारनें सुचविलें आहे.

**अरब प्रजासत्ताकांत तेलाची विहीर**—अरब प्रजासत्ताक राज्याच्या सिनाई द्वीपकल्पांत राज्यांतील सर्वांत मोठा तेलाचा साठा सांपडला आहे. भूमिगत तेल असणाऱ्या ह्या भागांत तेलाची पहिली विहीर खोदण्यांत आली असून तीमधून दररोज ७०० टन तेल उपसण्यांत येत आहे. दरसाल ३,६०,००० टन तेलाचें उत्पादन लवकरच होऊं लागेल.

**ब्रह्मदेशाची तागाची निर्यात**—डंडी (ब्रिटन) येथील तागाच्या गिरण्यांना लागणारा कांहीं ताग ब्रह्मदेशाकडून मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळें पाकिस्तानच्या तागावर गिरण्यांना कमी प्रमाणांत अवलंबून रहावें लागेल. चालू वर्षांत ब्रह्मदेश, ब्रिटन व पश्चिम युरोपांतील देश ह्यांना ६,००० टन कच्चा ताग निर्यात करील असा अंदाज आहे.

**भारताच्या औषधांना बाजारपेठ**—भारतामधील कारखान्यांनीं तयार केलेल्या औषधांना मॉरिशस बेटांत चांगली बाजारपेठ मिळण्याचा संभव आहे. सध्या तेथील लोकांना आपल्या औषधाच्या गरजा मुख्यतः पश्चिम जर्मनी व ग्रेट ब्रिटन ह्या देशांकडून होणाऱ्या आयातीच्या साह्यानें भागवाव्या लागतात.

**इंडोनेशिआंत पोलादाचे कारखाने**— इंडोनेशिआच्या सरकारनें पोलादाचे दोन कारखाने काढण्याचें ठरविलें आहे. एक कारखाना पूर्व जाव्हांत व दुसरा पश्चिम जाव्हांत काढण्यांत येणार आहे. प्रत्येक कारखाना दरसाल ५०,००० टन पोलाद उत्पन्न करूं शकेल. कारखाने काढण्याच्या कामीं रशिआनें कर्ज व तंत्रज्ञांची मदत देऊं केली आहे.

**काटकसरीचें धोरण**—चालू वर्षींच्या संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आमसभेसाठी पाठवावयाच्या प्रतिनिधींच्या संख्येंत सरकारनें कपात केली आहे. ह्या मंडळांत इतर सभासदांबरोबर लोकसभेचे सहा सभासद आतांपर्यंत पाठविण्यांत येत असत. परंतु आतां काटकसरीच्या धोरणास अनुसरून पार्लमेंटचे दोनच सभासद प्रतिनिधि म्हणून मंडळावर घेण्यांत येणार आहेत.

**पंजाबमध्यें नवा गौळवाडा**—अमृतसरपासून सहा मैलांवर असलेल्या एका गांवीं नवीन गौळवाडा स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या गौळवाड्यासाठीं ३१ लाख रुपये खर्च येईल. पंजाबमध्यें टेक्निकल को-ऑपरेशन मिशननें दिलेल्या एक कोटी रुपयांचा उपयोग करून असे चार गौळवाडे उभारण्यांत येणार आहेत. सरकारनें ३१ एकर जागा ताब्यांत घेतली आहे.


**क्विनिनचा खप कमी झाला**—भारतामधील क्विनिनचा खप गेल्या कांहीं वर्षांत ८० ते ८५ टक्क्यांनीं कमी झाला आहे. देशांत हिंवतापविरोधी मोहिमा करण्यांत आल्यामुळें हिंवतापावरील औषधांची निर्मिति १९५१-५२ च्या मानानें एक तृतीयांशानें घसरली आहे. परदेशांतून आयात करण्यांत येणाऱ्या हिंवतापावरील औषधांच्या आयातीची गरजहि फार कमी झाली आहे.

**सोडियम सल्फेटचा कारखाना**—राजस्थानमधील खाऱ्या सरोवरापासून सोडियम सल्फेट तयार करण्याचा एक कारखाना राजस्थानचें सरकार काढणार आहे. त्यासाठी १५ लाख रुपये लागतील. कारखाना उभारण्यास एक वर्ष लागेल व त्यांतून दररोज २० टन सोडियम सल्फेट तयार होईल. कागद, कांच, कापड इत्यादि धंद्यांत सोडियम सल्फेट वापरण्यांत येतें.

**गुन्हेगार-शास्त्राचा अभ्यासक्रम**—मध्यप्रदेशांतील सागर विद्यापीठानें आर्ट्स व सायन्स शाखेच्या तीन वर्षांच्या पदवी-परीक्षेसाठी गुन्हेगार-शास्त्राचा अभ्यास चालू वर्षापासून ठेवला आहे. गुन्हेगार-शास्त्राचा पदवी परीक्षेच्या अभ्यासक्रमांत समावेश करणारें सागर हें भारतामधील पहिलेंच विद्यापीठ आहे.

KM2/57

किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळण करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटल-पासून तयार केलेले असून वर्षानुवर्षे बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी ( द. सातारा )

अभिनव गुंतवणूक

आपणांस आपल्या पैशाचा योग्य मोबदला

( बँक शेड्यूल्ड ) बँक ऑफ पूना, लिमिटेड

याच्या

तीन – सहा – नऊ – बारा महिने मुदतीच्या ठेवीनें मिळतो.

कॅशसर्टिफिकेट इतकेंच व्याज. व्याज मिळून शिवाय रकमेची जरूर भासली तर ३ ते ५ वर्षें थांबावें लागत नाहीं. व्याज मुदत पुरी झाल्याबरोबर मिळतें व याच रकमेवर पुन्हां व्याज मिळवितां येतें. मुख्य ऑफिस अगर शाखाकचेर्‍यांकडे समक्ष चौकशी करा.

गो. गं. साठे, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २६ ऑगस्ट, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शेतजमीनधारणेची मर्यादा ठरविणारें बिल

शेत जमिनीच्या कमाल धारणेची मर्यादा ठरविणारें व कमाल मर्यादेपेक्षा अधिक असलेली जमीन ताब्यांत घेऊन तिची विल्हेवाट करण्याबाबत तरतूद करणारें बिल मुंबई सरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे. त्यावर प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांनीं मत व्यक्त करतांना म्हटलें आहे, कीं समाजांतील प्राप्तीची वाटणी न्याय्य व्हावी, सर्व प्रकारच्या कमाल उत्पन्नावरहि मर्यादा असावी, हें मान्य केलें तरी फक्त शेतीच्या उत्पन्नापुरतेंच हें तत्त्व अंमलांत आणणें योग्य होणार नाहीं. इतर क्षेत्रांतील लोकांनीं संपत्ति मिळवून मातब्बर बनत जावें आणि प्रतिष्ठा प्राप्त करून घ्यावी; पण शेतीच्या व्यवसायांतील लोकांनीं मात्र ठराविक उंचीपेक्षा कधींहि डोकें वर काढूं नये, हें इष्ट नाहीं. त्यामुळें शेतीपेक्षा इतर व्यवसायाकडेच कर्तबगार लोक सध्यांपेक्षाहि अधिक प्रमाणांत वळतील. जादा पडीक जमीन लागवडीखालीं आणण्यासाठी धारणेची कमाल मर्यादा ठरविणें इष्ट होईल, त्यामुळें जमीन नसणाऱ्या मजुरांच्या सहकारी सोसायट्यांना वाव मिळेल. अशी जादा जमीन भूमिहीनांना लागवडीसाठी तत्काळ उपलब्ध झाली आणि सहकारी शेती सुरू झाली, तरच त्याचा खरा फायदा होणार. प्रस्तुत बिलांतून वगळण्यांत आलेल्या बाबींचा उल्लेख करून प्रा. गाडगीळ ह्यांनीं त्यामागील उद्देशांबद्दल साशंकता व्यक्त केली आहे. एकदा कमाल उत्पन्नाची मर्यादा ठरल्यावर, एका व्यवसायाची त्या तरतुदींतून मुक्तता व्हावी आणि दुसऱ्याची होऊं नये, हें समर्थनीय नाहीं. समजा, केळीच्या लागवडीला बिल आड येऊं नये, पण उसाच्या लागवडीला तें आडवें यावें, पानमळ्याचें उत्पन्न ३,६०० रुपयांपेक्षा ज्यास्त झालें तरी चालावें पण तंबाखूचें मात्र नाहीं, ह्यामागील तत्त्व तरी कोणतें आहे ? औद्योगिक व व्यापारी उपक्रमांना मिळावयाच्या माफीला प्रा. गाडगीळांचा कसून विरोध आहे. शेतीचें सर्व उत्पन्न प्रत्यक्ष करांच्या कक्षेंत यायला हवें हें प्रा. गाडगीळांना एकदम मान्य आहे; त्याबाबत सरकारची दिरंगाई झाली आहे. प्रस्तुत बिलानें बरेच बिकट व किचकट प्रश्न उपस्थित केले असून, त्यानें समाजाच्या आर्थिक पायास धक्का बसणार आहे.

---

## गहूं विकत घेण्याचा करार लांबला ?

भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान ३० लाख टन गहूं विकत घेण्याचा करार होणार आहे. परंतु हा करार लांबण्याचीं लक्षणें दिसत आहेत. अमेरिकेप्रमाणेंच ऑस्ट्रेलिआ आणि कॅनडा हे देश मोठ्या प्रमाणावर गहूं पिकविणारे आहेत. गव्हाच्या किंमती योग्य पातळीवर राखण्याच्या दृष्टीनें हे सर्वच देश सहकार्यानें वागत असतात. भारताला गहूं पुरविण्याचा नवा करार करतांना त्यांत एक नवीन कलम घालण्याचा आग्रह कॅनडा व ऑस्ट्रेलिआ धरीत असल्याचें समजतें. एकूण खरेदीपैकी कांहीं विवक्षित गहूं भारतानें नेहमींच्या व्यापारी मार्गांनीं खरेदी करावा अशी त्यांची सूचना आहे. सुमारें ४,००,००० टन गहूं भारतानें मामुली व्यापारी पद्धतीनें विकत घ्यावा असें त्यांचें म्हणणें आहे. अमेरिकेकडून गहूं विकत घेण्याचा करार करण्याबाबतचीं बोलणीं गेले कांहीं महिने चालू आहेत. पण त्यांची फलश्रुति अजून दिसत नाहीं. त्याचें कारण ऑस्ट्रेलिआची व कॅनडाची वरील सूचना, हें आहे. भारताचें म्हणणें असें कीं मामुली व्यापारी पद्धतीनें गहू खरेदी करण्याइतकें परदेशीय चलन नसल्यामुळें अशी खरेदी भारताला करतां येणार नाहीं. ह्या पद्धतीनें होणाऱ्या गव्हाचा व्यवहार ऑस्ट्रेलिआ व कॅनडा ४ लाख टनांपेक्षा कमी करतील अशी आशा करण्यांत येत आहे. १९५६ सालीं भारतानें ४ लाख टनांची खरेदी अशा रीतीनें करण्यास मान्यता दिली होती. म्हणून हें कलम त्या वेळच्या करारांत घालण्यांत आलें होतें. इंटर नॅशनल व्हीट कौन्सिल ह्या संघटनेचे ऑस्ट्रेलिआ व कॅनडा हे दोन मोठे सभासद आहेत आणि शिलकी गव्हाच्या खरेदीसंबंधींचे करार करण्यापूर्वी कौन्सिलचा एक सभासद ह्या नात्यानें अमेरिकेला आपल्या संकल्पित व्यवहारांची माहिति कौन्सिलला द्यावी लागत असते.

---

## खनिज तेलाचा वाढत जाणारा खप

बर्मा शेल रिफायनरीज लि. ह्या कंपनीचे अध्यक्ष मि. मुडी ह्यांनीं भारताच्या तेलाच्या वाढत्या गरजेसंबंधीं आपला अंदाज व्यक्त केला आहे. त्यांच्या मतानें भारतांत पेट्रोल व त्यापासून बनविण्यांत येणाऱ्या मालाला अजून कित्येक वर्षें चांगला वाव आहे. देशांतील खनिज तेलाच्या खपाचें दरमाणशीं प्रमाण अवघें ३.८ गॅलन आहे. जगांतील इतर पुढारलेल्या देशांत हें प्रमाण कितीतरी अधिक आहे. खुद्द भारतांतहि खनिज तेलाचा खप वाढत चालला आहे. गेल्या १० वर्षांत खनिज तेलाची मागणी तिपटीनें वाढली असून आतां ती दरसाल ६० लाख टनांपर्यंत आली आहे. १९६७ पर्यंत खनिज तेलाचा खप १.२ कोटी टनापर्यंत जाईल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारतांत अजूनहि औद्योगिक शक्तीसाठीं दगडी कोळशाचा वापर करण्यांत येतो. तरीपण कोळशाऐवजीं तेलाचा जळण म्हणून उपयोग करण्याची प्रवृत्ति वाढत चाललेली आहे. विजेचा वापर औद्योगिक शक्तीसाठीं होत असला तरी त्याची टक्केवारी गेल्या १० वर्षांत फारशी वाढलेली नाहीं. अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करण्याची शक्यता असली तरी हें काम अतिशय खर्चाचें व दीर्घ कालावधि लागणारें असल्यानें अजून कित्येक वर्षें पार पाडतां येण्यासारखें नाहीं. तेव्हां एकंदरीनें तेलाच्या उद्योगधंद्याला अनुकूल परिस्थिति आहे. १९६७ पर्यंतच्या देशाच्या वाढत्या गरजा भागवावयाच्या तर त्यासाठीं ३६० कोटी रुपये गुंतवावे लागतील असा मि. मुडी ह्यांचा अंदाज आहे. ह्यापैकीं बहुतेक रक्कम तेलाचे नवीन साठे शोधण्याच्या कामीं खर्च करावी लागेल. त्याशिवाय तेलाचा उपसा, शुद्धीकरण व वाहतूक ह्यांची व्यवस्था करावी लागेल. अर्थातच ह्या कामीं फार मोठ्या परदेशी साह्याची जरूरी आहे.

### वनवर्धन : टेकड्यांच्या उतारांचा उपयोग

"अर्था"च्या दि. २९ जुलैच्या अंकांत 'वनमहोत्सव' ह्या शीर्षकाखालील लेखांत असें सुचविण्यांत आलें होतें, कीं वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवून त्या संबंधांत भारत स्वावलंबी करण्याकरितां आज ज्या नैसर्गिक संपत्तीचा उपयोग केला जात नाहीं, तिचा उपयोग करण्याच्या प्रयत्नांची आवश्यकता आहे. ह्या दृष्टीनें, सध्यां ज्या टेकड्या व डोंगरभाग उघडे पडलेले आहेत, त्यांचाहि उपयोग वनवर्धनाकडे करावा असेंहि सूचित करण्यांत आलें होतें. ह्या टेकड्या व डोंगर ह्यांच्या उतरणींची सर्व्हे होऊन लहान चर खणून, त्यामध्यें झाडांची लागवड व्हावी, अशीहि सूचना करण्यांत आली होती. सरकारच्या जंगलखात्यानें, अशा-प्रकारें जंगलांची वाढ प्रत्यक्षांत घडविण्याचे प्रयत्न करण्याचें ठरविलें आहे, असें दिसतें. जळगांवनजीक मेहरूण येथील जंगलामध्यें टेकड्यांच्या पायथ्यांशीं कंटूर बंडिंग करून व उतारावर चर खणून त्यांत झाडें लावणें, ह्यांचीं प्रात्यक्षिकें करण्यांत येणार आहेत, असें वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालें आहे. प्रात्यक्षिकांचा उपक्रम, ही खरोखरच समाधानाची गोष्ट आहे. भारताला स्वावलंबी बनविण्याच्या मार्गांतील प्राथमिक पावलांपैकीं हें एक पाऊल आहे; अशा मार्गानेंच प्रगति घडून येईल हें उघड आहे.

### दलाई लामावरील खर्च

दलाई लामाला हिंदी सरहद्दीपासून मसुरीला आणण्यासाठी सुमारें ८५,००० रु. खर्च आला. त्याच्या मसुरी येथील निवासा-प्रीत्यर्थ भारत सरकार दरमहा सुमारें २९,००० रु. खर्च करीत आहे.

### रुपयाची किंमत

१९४७ च्या मानानें आजची रुपयाची किंमत २९% नें घसरलेली आहे.

### श्री. देशमुख ह्यांचा सन्मान

श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांची १९५९ च्या रामन मॅगसेसे पारितोषिकासाठी निवड झाली आहे. आशिया खंडांत, सरकारी सर्वोत्कृष्ट सेवा करणाराला हा मान मिळतो. फिलिपाइन्सचे दिवंगत अध्यक्ष मॅगसेसे ह्यांच्या स्मरणार्थ ह्या पारितोषिकांची योजना करण्यांत आलेली आहे. मनिला येथें हीं पारितोषिकें समारंभपूर्वक दिलीं जातील. हीं पारितोषिकें म्हणजे आशिया-पुरती नोबेल पारितोषिकांच्या छोट्या प्रतिमाच होत. प्रत्येक पारितोषिकाची रक्कम १०,००० डॉलर्स आहे. पारितोषिकाचा स्वीकार करण्यासाठी श्री. देशमुख दि. २९ रोजीं मनिला येथें जाण्यासाठी निघतील.

### ३० लक्ष टन अमेरिकन गव्हाची आयात होणार

प. लॉ. ४८० खालीं, अमेरिकेंतून ३० लक्ष टन गहूं आयात करण्याचीं बोलणीं भारत सरकार अमेरिकन अधिकाऱ्यांबरोबर करीत आहे. १९५६ सालीं ह्याच पद्धतीनें भारताला ३७ लक्ष टन व १९५८ सालीं ३४ लक्ष टन गहूं मिळाला होता. भारताला अमेरिकन गहूं ११ ते १२ रु. मण दरानें पडेल; भारतांतील किंमतीपेक्षा हा दर स्वस्त आहे.

### जागतिक बँकेनें दिलेलीं कर्जें

जागतिक बँकेनें ३० जून, १९५९ अखेर संपलेल्या वर्षी ७०·३ कोटी डॉलर्सचीं ३० कर्जें मंजूर केलीं. ह्या पूर्वींच्या वर्षी ७१·७ कोटी डॉलर्सचीं कर्जें देण्यांत आलीं होतीं. ३० जून, १९५९ अखेरच्या कर्जांची एकूण रक्कम ४५२·२ कोटी डॉलर्स भरते.


## दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लिमिटेड

( मुख्य कचेरी : मुंबई )

जाहीर करण्यास आनंद होत आहे कीं, आमची

'डेक्कन जिमखाना शाखा'

सेफ डिपॉझिट लॉकर्सच्या व्यवस्थेसहित

**२१ ऑगस्ट १९५९ रोजीं सुरू झाली.**

पत्ता— डेक्कन जिमखाना, पोस्ट ऑफिसजवळ, पुणें ४.

कामाच्या वेळा :— सोमवार ते शुक्रवार स. १०॥ ते २॥
शनिवारीं १०॥ ते १२॥

जे. डी. मोबेदजी
चीफ एजन्ट, पुणें-२

एन. के. करंजिया
जनरल मॅनेजर

# जमीनधारणेचें कमाल क्षेत्र ठरविलें जाणार

## वार्षिक ३,६०० रुपये उत्पन्नाची मर्यादा

शेतजमिनीच्या कमाल धारणेची मर्यादा ठरविणें व कमाल मर्यादेपेक्षा अधिक असलेली जमीन ताब्यांत घेऊन तिची विल्हेवाट करण्याबाबतची तरतूद करणारें बिल मुंबई सरकारच्या दि. ४-८-५९ च्या जादा गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे. या बिलाप्रमाणें सरकार प्रत्येक स्थानिक विभागासाठी कमाल जमीनधारणक्षेत्र जाहीर करील. यासाठी सालिना फक्त ३,६०० रुपये उत्पन्न मिळेल इतकें क्षेत्र प्रमाणभूत समजण्यांत येईल.

### मालक व कूळ, दोघांनाहि तरतूद लागू

सरकार जाहीर करील त्या तारखेपासून कोणाहि जमीन-मालकाला अथवा कुळाला कमाल जमीन धारण क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करतां येणार नाहीं. या कायद्याचा अंमल सुरू होण्यापूर्वी अथवा जाहीरनामा होण्यापूर्वी जमीन विभक्त करण्यांत आली किंवा ती दुसऱ्याच्या नांवें करण्यांत आली व त्यामुळें या कायद्याचा हेतु असफल होण्याचा संभव असेल तर अशी अदलाबदल किंवा विभक्तीकरण कायदेशीर ठरूं नये म्हणून बिलांत तरतूद करण्यांत आली असून ती तरतूद १६ जानेवारी, १९५९ पासून अंमलांत आली असें समजण्यांत येणार आहे.

राज्याच्या निरनिराळ्या विभागांत जमिनीचें कमाल धारण-क्षेत्र ठरविण्याची तरतूद असलेले कायदे सध्यां अस्तित्वांत आहेत. तथापि त्यांतील तरतुदींत फरक आहे. तेव्हां सबंध राज्यांत जमिनीचें कमाल धारण-क्षेत्र ठरविणारा समान स्वरूपाचा कायदा अंमलांत आणण्याचें सरकारनें ठरविलें आहे. तेव्हां विद्यमान जमिनींच्या बाबतींत आणि भावी काळांत जमिनी घेण्याबाबत कमाल धारण-क्षेत्र ठरविण्याची तरतूद या बिलान्वयें करण्यांत आली असून, सबंध मुंबई राज्याला हा कायदा लागूं होईल.

### यादी तयार करणार

कमाल धारणक्षेत्राहून अधिक जमीन धारण करणाऱ्या प्रत्येक इसमानें आपण धारण करीत असलेल्या सर्व जमिनींची तपशीलवार माहिती संबंधित मामलेदारांना कळवली पाहिजे असें या बिलान्वयें ठरविण्यांत आलें असून या माहितीच्या व अन्य माहितीच्या आधारें जादा जमीन असणारांची व प्रत्येकाची किंवा जादा जमीन आहे याची ट्रिब्यूनल यादी तयार करील. तथापि जमीन-धारकाला आपल्या जमिनींपैकीं कोणती जमीन स्वतःसाठीं हवी असेल ती निवडण्याचें स्वातंत्र्य राहील. मात्र त्याला सदरहू बिलाच्या कलम २० च्या पोटकलम (३) मधील तरतुदीनुसारच ही निवड करावी लागेल.

ज्या अपंग जमीनदारांनीं आणि गरीब जमीनदारांनीं आपली जमीन कमाल धारणक्षेत्राहून अधिक जमीन धारण करणाऱ्या इसमांना खंडानें दिली असेल अशा जमीनदारांना मदत म्हणून संबंधित इसमाकडील शिलकी जमीन परत देण्याचीहि तरतूद या बिलान्वयें करण्यांत आली आहे.

### कायद्यांतून वगळलेल्या जमिनी

पुढील प्रकारच्या जमिनी सदरहू कायद्याच्या कक्षेंतून वगळ-ण्यांत आल्या आहेत. सरकारी मालकीच्या जमिनी, कूळकायद्याखालीं बिगर शेतीच्या व औद्योगिक विकासासाठी राखून ठेवलेल्या जमिनी, शैक्षणिक कार्यासाठी वा हॉस्पिटलांसाठी वगैरे सार्वजनिक विश्वस्त निधींच्या जमिनी, सरकारनें मान्यता दिलेल्या व्यापारी संस्थांच्या व उद्योगधंद्यांच्या जमिनी, कॉफीच्या वा फळाफुलांच्या लागवडीसाठी उपयोगांत आणलेल्या जमिनी. मात्र अशा जमिनी त्या इसमाच्या इतर जमिनींचें कमाल धारण क्षेत्र ठरवितांना विचारांत घेतल्या जातील.

### शेतसाऱ्याच्या १०० पट भरपाई

जादा किंवा शिल्लक म्हणून जाहीर झालेल्या सर्व जमिनी संपूर्ण-पणें बोजाविरहित अशा स्वरूपांत सरकारच्या ताब्यांत राहतील. याबाबतींत सरकार शेतसाऱ्याच्या १०० पट, अधिक जमिनीवरील कायम स्वरूपाच्या इमारती व विहीर यांचा व सारा वजा करून राहिलेल्या किंमतीइतकी रक्कम नुकसानभरपाई म्हणून देईल.

ज्या ठिकाणीं शिलकी जमीन सरकारकडून खंडानें घेतली असेल तेथें नुकसानभरपाई, शेतसाऱ्याच्या १२ पट, अधिक जमिनीवरील मालमत्तेच्या ठरविलेल्या किंमतीइतकी असेल.

### भरपाईची किंमत कशी मिळणार?

नुकसानभरपाईची रक्कम रोखीनें किंवा ट्रॅन्स्फरेबल बॉण्डसमध्यें किंवा अंशतः रोखीनें व अंशतः ट्रॅन्स्फरेबल बॉण्डसमध्यें असें सरकार ठरवील त्याप्रमाणें देण्यांत येईल. बॉण्डस् दिल्यापासून त्यावर दरसाल दरशेंकडा ३ टक्के दरानें व्याज दिलें जाईल. मुद्दल व व्याज २० वर्षांत समान वार्षिक हप्त्यांनीं परत केलें जाईल. जी शिलकी जमीन कुळाकडील असेल अशा बाबतींत नुकसानभरपाईची ⅔ रक्कम जमीनदाराला व ⅓ कुळाला देण्यांत येईल. ट्रिब्यूनलनें नुकसानभरपाईच्या बाबतींत दिलेल्या निवाड्या-विरुद्ध मुंबई रेव्हेन्यू ट्रिब्यूनलकडे अपील करतां येण्याची तरतूदहि सदरहू बिलान्वयें करण्यांत आली आहे.

### जमीन कोणाला मिळणार?

सरकारजवळील जादा जमिनी सरकार ठरवील त्या नियमां-नुसार ठरविलेली वहिवाटीची किंमत घेऊन ३२ व्या कलमाप्रमाणें अग्रहक्क मिळालेल्या लोकांना किंवा सहकारी शेती सोसायट्यांना देईल. अशा जमिनी कलेक्टरांच्या पूर्वसंमतीखेरीज विभक्त करतां येणार नाहींत, किंवा दुसऱ्याच्या नांवें करून देतां येणार नाहींत. सहकारी संस्थांना सलग अशी जमीन देतां यावी म्हणून तशी जमीन ताब्यांत घेण्याचा अधिकार कलेक्टरांना देण्यांत आला आहे. अशा रीतीनें ताब्यांत घेण्यांत आलेल्या जमिनींच्या बाबतींत लँड ॲक्विझिशन कायद्याच्या तरतुदींनुसार नुकसान-भरपाई देण्यांत येईल.

सदरहू कायद्यांतील तरतुदींनुसार शिलकी जमिनींची कायम विल्हेवाट लावीपर्यंतच्या काळांत त्या पडून राहूं नयेत म्हणून अशा जमिनी लागवडीसाठी तात्पुरत्या खंडानें देण्याचा अधिकार या बिलान्वयें मामलेदारांना देण्यांत आला आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### पुणें पोस्टल को. बँक लि.

[ कार्याध्यक्ष: श्री. डी. के. बाळ, पोस्ट मास्तर, पुणें. उप-कार्याध्यक्ष : मा. भि. वावळे. सन्मान्य चिटणीस : सी. एच. भाई.]

वरील बँकेच्या पटावर २,४५४ समासद असून वसूल भांडवल १,०५,४६० रु. आहे. ठेवी सुमारें ८½ लक्ष रुपयांच्या आहेत. सभासदांकडून कर्जेपोटी येणें ६,५९,५८२ रु. आहे. थकबाकी फक्त १,३५७ रु. आहे. अहवालाचे वर्षी वैयक्तिक जामिनकीवर ४,४३,३७६ रु. ची, काटकसर फंडाचे तारणावर ४,२०,७८५ रु. ची व विमापत्रकांचे तारणावर ३७८ रु. चीं कर्जे देण्यांत आलीं. बँकेनें इमारतीकरतां सध्याचे इमारतीपुढील ३२′ × १८′ अशी जागा पोस्ट खात्याकडे भाड्यानें मागितली आहे. ती पुढील वर्षांत मिळेल अशी आहे. त्या जागेवर सध्याचे इमारतीस जोडून दोन मजली इमारत बांधण्याचा विचार आहे. बँकेस ६,२४१ रु. निव्वळ नफा झाला. ५% डिव्हिडंडला ४,६७८ रु. लागतील.

### सेल्स टॅक्सची बाकी

मुंबई राज्यांतील व्यापाऱ्यांकडे सेल्स टॅक्सची बाकी रक्कम ३,३२,८६ ८२५ रु. आहे. पुण्यांतील व्यापाऱ्यांकडे ९,१०,५३२ रु. बाकी येणें आहे. जमिनीच्या साऱ्याच्या बाकीप्रमाणें सेल्स टॅक्सची बाकी वसूल करतां येत असल्यामुळें, वसुलीसाठी दावे लावण्यांत आलेले नाहींत. पुणें शहरांतील ६३९ व्यापाऱ्यांचीं प्रकरणें वसुलीसाठी रेव्हेन्यू अधिकाऱ्यांकडे पाठविण्यांत आलीं आहेत; ह्या व्यापाऱ्यांकडे ४,९४,८२० रु. बाकी आहे. मुंबई शहरांतील तत्सम आंकडे ६,३३४ व्यापारी व १,३२,८४,४९७ रु. बाकी, असे आहेत.

### बँकिंगविषयक निबंध-स्पर्धा

श्री. प्राणलाल देवकरण नानजी स्मारक फंडाच्या विश्वस्तांनीं चालू आर्थिक प्रश्नांच्या अभ्यासास चालना देण्याकरितां एक निबंध-स्पर्धा योजिली आहे. निबंधाचा विषय, " भांडवलाच्या निर्मितीस आणि औद्योगिक कर्जपुरवठ्यास बँकिंग कसा हातभार लावूं शकेल ? " असा आहे. सर्वोत्कृष्ट निबंधास १,००० रुपयांचें बक्षीस मिळेल. श्री. एम्. ए. मास्टर ( सुप्रसिद्ध उद्योगपति ) व एच्. टी परेख ( इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे जनरल मॅनेजर ) हे दोघे परीक्षकाचें काम करतील. निबंध-स्पर्धा सर्वांना खुली आहे.

### आग्रा येथें पू. जर्मनीसाठी बुटांची निर्मिति

पूर्व जर्मनीची, बुटांच्या ६० ००० जोड्यांची मागणी पुरी करण्यासाठी आग्रा येथील चर्मकार रात्रंदिवस खपत आहेत. कारखानदार दररोज ८०० ते १,००० जोड्या नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनला पुरवीत आहेत. आग्रा येथील कारखानदार एकूण ४०,००० जोड्या पुरवितील. बाकीच्या दिल्ली व मुंबई येथून पुरविल्या जातील. पूर्व जर्मनीचे अधिकारी आग्रा येथें जाऊन बूट तपासून घेतात.

### राज्य सरकारांची यशस्वी कर्जउभारणी

तेरा राज्य सरकारांनीं उभारलेलीं ६१.५ कोटी रुपयांचीं कर्जे यशस्वी झालीं आहेत. बहुतेक राज्य सरकारांच्या कर्जांस विक्रीस काढलेल्या कर्जरोख्यांपेक्षा जास्त मागणी आली. जाहीर केलेल्या कर्जापेक्षा १०% पर्यंत जास्त रक्कम ठेवून घेण्यांत येईल. म्हणजे, प्रत्यक्ष कर्जउभारणी ६७ कोटी रुपयांची होईल.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

( १ ) पुणें लष्कर ( २ ) बारामती ( ३ ) लोणावळा
( ४ ) श्रीरामपूर ( ५ ) ओझर ( जि. नाशिक )
( ६ ) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

## कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : - श्री. वा. काळे, संपादक, ' अर्थ '

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



## एक्सपोर्ट रिस्क्स इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची कार्यपद्धति

परदेशांतील खरेदीदारानें, त्याला रद्द करतां येणार नाहीं असें ( इर्रिव्होकेबल ) लेटर ऑफ क्रेडिट उघडलें असेल व भारतांतील बँकेनें त्याबाबत हमी घेतली असेल, तर परदेशाला माल निर्गत करणाराला धोका उरत नाहीं. अशा परिस्थितीमुळें, हुंडीचे पैसे देण्यापूर्वी बँक खरेदीदाराच्या पतीविषयीं स्वतःची खात्री करून घेते, आणि खरेदीदार पैसे भरूं शकला नाहीं किंवा त्यानें भरलेले पैसे भारतांत येण्यास विलंब लागला किंवा अशक्य झालें तर निर्गत करणाराला पैशाची परतफेड करतां येईल ना, हें तपासून घेते. परदेशांतील खरेदीदाराविषयीं कसून चौकशी केलेली असली, तरी निर्गत करणाराची स्थिति चांगली असणें तितकेंच महत्त्वाचें असतें. कारण, पाठविलेल्या मालाचे पैसे भारतांत आले नाहींत, तर बँकेला तिनें निर्गतवाल्याला दिलेले पैसे वसूल करतां आले पाहिजेत. त्यामुळें, हुंड्यांचे तारणावर बँक जी रक्कम देते, ती निर्गतदाराच्या आर्थिक परिस्थितीवरच अखेर अवलंबून रहाते. ह्यामुळें, निर्गतदाराला किती रक्कम उभारतां येईल, हेंहि नियमित होतें; त्या मानानेंच त्याला निर्गत व्यापार वाढवितां येतो. परदेशांतील खरेदीदारानें ठरल्याप्रमाणें पैसे देऊन माल सोडवून घेतला नाहीं तर निर्गतदाराचें पुढें धंदा चालू ठेवण्याचें सामर्थ्य घटतें. एक्सपोर्ट रिस्क्स इन्शुअरन्स कॉर्पोरेशन निर्गतदारांना हमी देऊन त्यांची सोय करूं शकते. निर्गतदाराचीच चूक नसेल, तर निर्गतीमधील धोका कॉर्पोरेशन पत्करते आणि होणारें नुकसान ८०% पर्यंत भरून देते. डी. ए. ( डॉक्युमेंटस ऑन अॅक्सेप्टन्स ) आणि डी. पी. ( डॉक्युमेंटस ऑन पेमेंट ) ह्यांच्या आधारावरील ती निर्गत हवी. कॉर्पोरेशनच्या गॅरंटीची विमा पॉलिसी निर्गतदार बँकेला कॉर्पोरेशनच्या संमतीनें असाइन करून देतो. कांहीं नुकसान आलें तर बँकेला कॉर्पोरेशनकडून त्याची भरपाई करून मिळते. येणाऱ्या क्लेम्सचे पैसे देण्यास कॉर्पोरेशनची जिंदगी जोंपर्यंत पुरेशी आहे, तोंपर्यंत बँकांनीं विमेदार निर्गतदारांच्या बिलांचे तारणावर त्यांना कर्ज देण्यास कचरण्याचें कारण नाहीं. आतांपर्यंत कुठल्याच देशांत, कुठल्याच वर्षीं, क्लेमच्या रूपानें एकूण पत्करलेल्या जोखमीच्या ७ ते ८% पेक्षां जास्त रक्कम द्यावी लागलेली नाहीं. ह्या अनुभवाच्या आधारें एक्सपोर्ट रिस्क्स इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें आपलें खपलेलें भांडवल आणि रिझर्व्हज् ह्यांच्या दहापटीपेक्षा जास्त जोखमीचे विमे देऊं नयेत, असें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें खपलेलें भांडवल २·५ कोटी रु. आहे; तेव्हां त्याला २५ कोटी रुपयांपर्यंतच्या जोखमीचे विमे देतां येतील. कॉर्पोरेशनची विमा पॉलिसी असल्यावर, खरेदीदाराच्या आर्थिक परिस्थितीबद्दल काळजी करण्याचें बँकांना कारण नाहीं. निर्गतदाराची व्यवहारपद्धति, पॉलिसीच्या अटी न पाळण्याची त्याची शक्यता, इत्यादि गोष्टींचा विचार मात्र बँकेला करावा लागतो.

### चेकनें पेन्शन दिल्यामुळें गैरसोय

ज्या पेन्शनरांचें पेन्शन १०० रुपयांपेक्षा जास्त आहे अशांना पेन्शनची रक्कम रोखीऐवजीं चेकनें देण्यास मुंबई कॉर्पोरेशननें गेल्या महिन्यापासून प्रारंभ केला आहे. ज्यांचें बँकेंत खातें नाहीं, अशांना चेकनें पैसे मिळणें त्यामुळें अवघड जात आहे; कारण ओळख पटवल्याखेरीज स्टेट बँकेंत पैसे मिळूं शकत नाहींत. ओळख पटविली, तरी पेन्शनरांना बँकेंत फार वेळ तिष्ठत बसावें लागतें.

### सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या डेक्कन जिमखाना शाखेचें उद्‌घाटन

दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मुंबई, च्या डेक्कन जिमखाना शाखेचें उद्‌घाटन शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजीं सकाळीं १०–३० वाजतां झालें. ह्या विभागांतील इतर बँकांच्या शाखा सकाळीं व संध्याकाळीं उघडया असतात; सेंट्रल बँकेची शाखा बँकिंगच्या नेहमींच्याच वेळा ( १०॥ ते २॥ ) पाळणार आहे, हें ह्या शाखेचें वैशिष्ट्य आहे. बँकेच्या इतर शाखा ( १ ) लक्ष्मी रोड, ( २ ) ईस्ट स्ट्रीट व ( ३ ) टिळक रोड येथें आहेत. बँकेच्या एकूण शाखांची संख्या ३०० चेवर आहे आणि भारतांतील ही सर्वांत मोठी बिन-सरकारी बँक आहे. डेक्कन जिमखाना शाखेंत टिळक रोड शाखेप्रमाणेंच, सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकेच्या पुण्यांतील प्रत्येक नव्या शाखेचे प्रारंभींचे अधिकारी म्हणून श्री. बी. बी. पुरोहित ह्यांचीच नियुक्ति झालेली आहे. तेच डेक्कन जिमखाना शाखेचे पहिले अधिकारी आहेत.

### घरगुती नोकरांचे किमान पगार व रजा

घरगुती नोकरांचे पगार व रजा ह्यांची तरतूद करणारें एक बिल श्री. पी. एन. राजभोज ह्यांनीं राज्यसभेंत मांडलें आहे. घरगुती नोकरांची पोलिसनाक्यांवर नोंद करण्यांत यावी, पोलिसांनीं त्यांच्यासंबंधीं माहिती मिळवून ठेवावी, १८ वर्षांखालील नोकराला किमान ३० रुपये व त्यापेक्षा जास्त वयाच्या नोकराला किमान ४० रुपये पगार मिळावा, आठवड्यांतून एक दिवस सुट्टी असावी, वर्षांतून १२ दिवस कॅज्युअल आणि १५ दिवस हक्काची रजा मिळावी, इत्यादि तरतुदी बिलामध्यें आहेत.

### स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि., खडकी

वरील कंपनीनें १९५८ मध्यें ५३,६६,१२६ रु. च्या मालाचें उत्पादन व ५१,२२,२१६ रु. च्या मालाची विक्री केली आणि ४,५०,८२५ रु. निव्वळ नफा मिळविला. त्यांतून शिलकी घसारा काढण्यासाठी २,२७,००७ रु. चा विनियोग करण्यांत आला; १,२०,४७६ रु. वेगवेगळ्या रिझर्व्हजमध्यें घालण्यांत आले आणि डिव्हिडंडसाठी ९२,३८८ रु. चा विनियोग केला. ऑर्डिनरी शेअर्सवर ५% डिव्हिडंड देण्यांत आलें. कंपनीचें वसूल भांडवल १८,२३,८३३ रु. आहे, तिनें २२,२३,७१५ रु. ची बँकेकडून व इं. फि. कॉर्पोरेशनकडून कर्जें घेतलीं आहेत व ८,६८,५५४ रु. च्या मुदती ठेवी व तात्पुरती कर्जें आहेत.

**क्षयरोगावर नवें औषध**—बेलग्रेडपासून जवळच असलेल्या एका औषधी कारखान्यानें क्षयरोगाच्या विविध प्रकारावर गुणकारी ठरणारें औषध शोधून काढलें आहे. त्याचें उत्पादन लवकरच सुरू होईल. बेलग्रेडमधील एका वैद्यकीय संशोधकानें २० वर्षें परिश्रम करून औषध तयार केलें आहे. औषधाचें नांव 'बिओफिल' असें ठेवण्यांत आलें आहे.

**फ्रान्सच्या अणुबाँबचे निर्माते**—फ्रान्स स्वतः तयार केलेला अणुबाँब लवकरच सहारा वाळवंटांत उडविणार आहे. परंतु हा बाँब तयार करण्याच्या कामीं हिटलरच्या अमदानींतील कांहीं जर्मन शास्त्रज्ञांनीं हातभार लावल्याची खळबळजनक बातमी पसरली आहे. फ्रेंच सरकारचें म्हणणें मात्र हा अणुबाँब सर्वस्वी फ्रेंच शास्त्रज्ञांनीं बनविलेला असेल असें आहे. आतां ह्या कामीं गुप्तपोलिसांची चौकशी सुरू झाली आहे.

### हातमागाच्या कापडाची अमेरिकेला निर्यात

शिकॅगो येथें भरविण्यांत आलेल्या व्यापारी प्रदर्शनासाठी भारताच्या हातमागधंद्याचें प्रतिनिधि मंडळ गेलें होतें. प्रतिनिधि-मंडळानें भारतामधील हातमागावर तयार झालेल्या कापडासाठी २० लाख डॉलर्स किंमतीच्या मागण्या नोंदविण्यांत यश मिळविलें आहे. कापडाची मागणी दोन हप्त्यांत पुरी करावयाची आहे. पुढील फेब्रुआरीच्या सुमारास १० लाख डॉलर्स किंमतीचें कापड पुरवावयाचें असून उरलेलें कापड १९६० च्या अखेरीपर्यंत पुरवावयाचें आहे. प्रतिनिधि मंडळानें नोंदलेल्या मागणीवरून अमेरिकेतील ह्या मालाच्या मागणीचें पुरें मोजमाप झालेलें आहे; असा मात्र अर्थ नाहीं. उलट, भारतामधील हातमागाचा धंदा ज्या प्रमाणांत मागण्या पुरवूं शकेल त्याच प्रमाणांत जबाबदारी स्वीकारण्यांत आली आहे. योग्य वेळीं व योग्य प्रकारचें कापड भारतांत उपलब्ध होऊं शकेल अशी खात्री झाल्यावरच ह्या मागण्या नोंदण्यांत आल्या. आणखीहि मागण्या नोंदण्यांत आल्या होत्या. पण हातमागाच्या कापडाविषयीं अमेरिकन व्यापाऱ्यांनीं पूर्वी तक्रारी केल्या होत्या. म्हणून सर्वच मागण्या स्वीकारण्यांत आल्या नाहींत. अधिक कापड मिळण्याची शक्यता असेल तर आणखीहि मागण्या स्वीकारण्यांत येतील. असें प्रतिनिधि मंडळाचें म्हणणें आहे. १९५८ मध्यें भारतानें अमेरिकेला १० लाख डॉलर्स किंमतीपेक्षा अधिक किंमतीचें हातमागाचें कापड निर्यात केलें. चालू वर्षी हातमाग कापडाची विक्री ३५ लाख ते ४० लाख डॉलर्स किंमतीची होईल असा अंदाज आहे. एकूण २० लाख डॉलर्सच्या नोंदलेल्या मागण्यांपैकी ६० टक्के मागण्या कापसाच्या सुताच्या कापडाच्या आहेत आणि बाकीच्या रेशमी कापडासाठी आहेत. हातमागाच्या कापडाला अमेरिकेंत वाढती बाजारपेठ मिळणें शक्य आहे.

### धंद्याच्या विकासासाठी कर्जाचा विनियोग

स्टॅफर्ड, इंग्लंड, येथील लेस्ली थॉमसन ह्या घरफोड्याला तीन वर्षे कारागृहवासाची शिक्षा देण्यांत आली. आपल्या धंद्याच्या विकासासाठीं त्यानें एका बँकेकडून कर्ज मिळविलें होतें व त्या कर्जाच्या पैशांतून चोरीचा माल वहाण्यासाठी त्यानें एक ट्रक विकत घेतली होती.

### नव्या साखर कारखान्यांना लायसेन्स मिळणार

चालू साखर कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढविण्यास आणि नवे साखर कारखाने काढण्यास मध्यवर्ती सरकारनें लायसेन्स देण्याचें ठरविलें आहे. साखरेच्या वाढत्या खपास तोंड देण्याची ही पूर्वतयारी आहे.

५०

वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ | सारस्वत बँक गृह, मुंबई ४. | टेलिफोन : २७०१४

बँकेचे सभासद आणि ठेवीदार यांच्या सोईसाठी

आमच्या वरळी, दादर आणि पुणें शाखेंत माफक दरांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय करण्यांत आली आहे.

सविस्तर माहिती शाखाधिकाऱ्यांकडे मिळेल.

शाखा : फोर्ट, दादर, माहिम, वरळी, पुणें, बेळगांव.
महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव मुंबई ४.

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३०,४९०
खेळतें भांडवल ... ... रु. ५६,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १¾% टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.